::- जाहिर सूचना -::

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५
प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी

जा.क्र.नंवाशमनपा// निवड/372/२५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक :- 18/११/२०२५

ज्याअर्थी,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक -२०२५ करीता राज्य निवडणुक आयोगाचे आदेश क्रमाक रानिआ/मनपा/२०२५/प्रक्र.४१/का-५, दि.१३.११.२०२५ अन्वये मतदार यादी तयार करणे व प्रसिध्द करणे बाबत सुधारीत कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

त्याअर्थी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रं. ०१ ते २० मधील जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, दि. ०१ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या, ८६ उत्तर नांदेड व ८७ दक्षिण नांदेड, विधान सभा मतदार संघाच्या मतदार यादीवरुन ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.१ ते २० च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी तयार केलेली प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी दिनांक २०.११.२०२५ रोजी जनतेच्या माहितीसाठी व पाहण्यासाठी मनपाच्या क्षेत्रिय कार्यालयात कार्यालयीन वेळेत खालील प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत येणारे प्रभाग |
|---|---|---|
| | क्षेत्रिय कार्यालय क्र. ०१ तरोडा/सांगवी | प्रभाग क्रमाक १,२,३ |
| | क्षेत्रिय कार्यालय क्र. ०२ अशोकनगर | प्रभाग क्रमांक ४,५,९,१० |
| | क्षेत्रिय कार्यालय क्र. ०३ गणेशनगर | प्रभाग क्रमांक ६,७,८ |
| | क्षेत्रिय कार्यालय क्र. ०४ वजिराबाद | प्रभाग क्रमांक १५,१६,१७,१८ |
| | क्षेत्रिय कार्यालय क्र. ०५ इतवारा | प्रभाग क्रमांक ११,१२,१३,१४ |
| | क्षेत्रिय कार्यालय क्र. ०६ सिडको/वाघाळा | प्रभाग क्रमांक १९,२० |

मा. राज्य निवडणुक आयोगाचे आदेश व निर्देशानुसार प्रारुप मतदार यादी संदर्भात कांही हरकती व सूचना असल्यास, त्या दि. २०.११.२०२५ ते दि. २७.११.२०२५ पर्यंत संबधित क्षेत्रिय कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल कराव्यात. उक्त दिनांकानंतर प्राप्त होणा-या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही ,याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

तसेच मतदार यादी पाहण्यासाठी प्रशिक्षण हॉल, खोली क्रमांक ३०५, तिसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, मनपा नांदेड येथे उपलब्ध आहे. तसेच महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nwcmc.gov.in वरही याद्या उपलब्ध आहेत.

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

दिनांक :- २०.११.२०२५
ठिकाण :- नांदेड.

उप आयुक्त (प्रशासन) तथा
प्राधिकृत अधिकारी ( मतदार यादी)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.